सातारा जिल्हा परिषद, सातारा
सामान्य प्रशासन विभाग
कार्यालयाचा पत्ता : जिल्हा परिषद मुख्य इमारत, ४था मजला, सातारा-कोरेगांव रोड, सदर बझार कॅंप ता. जि.सातारा.
कार्यालय दुरध्वनी क्रं ०२१६२-२९५०५३ Email-dyceogadstr@gmail.com

**विषय** - अधिकारी/कर्मचारी यांनी रजेवर जाण्यापुर्वी
कार्यालय प्रमुखांची परवानगी घेणेबाबत.

जा.क्र.आस्था-२(३)/परिपत्रक/१७४५५४८/कावि-१३२४/२०२५
सामान्य प्रशासन विभाग
सातारा जिल्हा परिषद सातारा
दिनांक - १७/०४/२०२५

## परिपत्रक

या परिपत्रकाव्दारे कळविणेत येते की, अधिकारी/कर्मचारी हे विना परवानगी परस्पर रजेचा अर्ज देवून रजेवर जातात. ही बाब माझे निदर्शनास आली आहे.त्यामुळे कार्यालयीन कामकाजात अडथळा निर्माण होतो.

महाराष्ट्र सेवा (रजा) नियम १९८१ मधील प्रकरण तीन ( सर्वसाधारण शर्ती ) मधील १० मधील १) रजा म्हणजे सक्षम प्राधिकाऱ्यांने स्वेच्छानिर्णयानुसार कामावर अनुपस्थित राहण्यास दिलेली परवानगी, २) हक्क म्हणून रजा मागता येणार नाही व ३) रजा मंजूर करणारा सक्षम प्राधिकारी लोकसेवेच्या निकडीमुळे कोणत्याही प्रकारची रजा नाकारणे किंवा रद्द करू शकतात, अशी तरतूद आहे.

तथापि कोणतेही अधिकारी पूर्व परवानगी घेवून रजेवर जात नाहीत.ही बाब योग्य नसून कार्यालयीन शिस्तीस धरुन नाही. तरी अधिकाऱ्यांनी कोणत्याही प्रकारच्या रजेवर जाताना माझी पुर्व परवानगी घेवूनच रजेवर जाणेचे आहे. अत्यंत निकडीच्या वेळी Whatsapp/SMS व्दारे परवानगी घेण्यात यावी. तसे न केल्यास अधिकाऱ्यांचा रजा कालावधी विनावेतन करणेत येईल, याची नोंद घ्यावी.

तसेच खातेप्रमुख/कार्यालयप्रमुख यांचे अधिनस्त कार्यरत वर्ग - ३ व वर्ग - ४ कर्मचाऱ्यांनी खातेप्रमुख /कार्यालय प्रमुख यांची पुर्व परवानगी घेवूनच रजेवर जाणेचे आहे. सदरची बाब सर्व कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून दयावी.

Signed by
Yashni Nagarajan
Date: 25-04-2025 12:04:51

याशनी नागराजन,भा.प्र.से.,
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**सातारा जिल्हा परिषद,सातारा**

प्रति

१) खातेप्रमुख (सर्व ) --------
जिल्हा परिषद सातारा
२) गटविकास अधिकारी (सर्व)
पंचायत समिती -----------